# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,
पनवेल - ४१०२०६.

दुरध्वनी कार्यालय : ०२२ – २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com


जा.क्र./पमपा/वै.आ.वि/२५८५/सन २०२३-२४ दिनांक:-०७/१२/२०२३

## अधिपरिचारिका (स्त्री), अधिपरिचारिका (पुरूष), आरोग्यसेविका, LHV व प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदासाठी पात्र, हंगामी पात्र व अपात्र यादी

**पनवेल महानगरपालिकास्तरावरील, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दि. २०.१०.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार "अधिपरिचारिका (स्त्री), अधिपरिचारिका (पुरूष), आरोग्यसेविका, LHV व प्रयोगशाळा तंत्रज्ञ" या रिक्त पदांसाठी उमेदवाराकडून प्राप्त झालेल्या अर्जानुसार पात्र, हंगामी पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिपरिचारिका (स्त्री), अधिपरिचारिका (पुरूष), आरोग्यसेविका, LHV व प्रयोगशाळा तंत्रज्ञ ही रिक्त पदे भरण्यासाठी कंत्राटी स्वरूपात व करार पद्धतीने मानधन तत्वावर पदे भरणेकरीता पनवेल महानगरपालिका स्तरावरुन दि. २०.१०.२०२३ रोजी वृत्तपत्रात तसेच पालिकेच्या https://www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर जाहिरात प्रदर्शित करण्यात आली होती, त्यानुसार दिनांक २०.१०.२०२३ ते २१.११.२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य विभाग, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल - ४१०२०६ येथे अर्ज स्विकारण्यात आले होते. तसेच ई – मेल द्वारे उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

निवड समितीने वरील सर्व उमेदवारांच्या अर्जाची व उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी केली असुन उमेदवारांची प्रपत्र द्वारे पात्र (Eligible), तात्पुरते पात्र (Conditional Eligible) व अपात्र (Not Eligible) अशा स्वरूपात हंगामी यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सोबत प्रपत्र अ, ब, क जोडत आहे.

१) प्रत्येक उमेदवाराने सोबतच्या हंगामी स्वरूपातील पात्र, तात्पुरते पात्र व अपात्र यादी चे अवलोकन करावे, जे उमेदवार कागदपत्राअभावी अथवा तांत्रिक कारणानास्तव प्रथमदर्शनी तात्पुरते पात्र, अपात्र ठरत आहेत, त्यांनी यादीतील आपल्या नावासमोरील **"REMARK" या स्तंभामधील** कागदपत्रे / बाबी यांची वैद्यकीय आरोग्य विभाग, पनवेल महानगरपालिका कार्यालयात टपालाने किंवा ई- मेल द्वारे सादर करावयाची आहेत.

**२) उमेदवाराच्या यादीतील त्यांच्या नावासमोरील REMARK या स्तंभामधील नमुद केलेली खालील आवश्यक कागदपत्रे स्विकारले जातील :**

अ) शैक्षणिक कागदपत्राची पुर्तता, ( ग्रेड अथवा श्रेणी याचे गुणांमध्ये संबंधित संस्थेकडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र, गुणपत्रिका, पदवी / पदवीका प्रमाणपत्र, MNC Registration Certificate, Maharashtra Paramedical Council Registration, MS CIT Certificate, Adhar Card, Name Change Gazzete ) जात / वैधता, प्रमाणपत्र, Non Creamylayer प्रमाणपत्र.

Scanned with CamScanner

ब) ज्या उमेदवारांनी धनाकर्ष चा (DD) छायांकित प्रत सादर केलेली आहे, त्या उमेदवारांनी Original धनाकर्ष सादर करावा.

क) वरील अ व ब मधील कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल, त्यामुळे अशा अपात्र अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ड) वरील अ व ब व्यतीरिक्त इतर नव्याने कोणतीही कागदपत्रे स्विकारले जाणार नाहीत. उदा.

- अपुर्ण / चुकीचे अर्ज
- नव्याने काढलेला D.D
- या व्यतीरिक्त पुर्वी सादर न केलेले अनुभव प्रमाणपत्र

३) कागदपत्रांचे सर्व प्रती साक्षांकित किंवा स्वसाक्षांकित असाव्यात.

४) अनु. क्र. १ नुसार वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे दि.२.१२.२०२३ ते ०८.१२.२०२३ रोजीपर्यंत टपालाने, कुरीअरने पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य विभाग, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल - ४१०२०६ या पत्त्यावर व Email - nuhmpmc2023@gmail.com ई- मेल वर सादर करावीत.

५) विहित कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा / कागदपत्रांचा विचार विनिमय केला जाणार नाही, तसेच त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार अथवा दावा स्विकारला जाणार नाही.

६) उपरोक्त तात्पुरत्या पात्र (Conditional Eligible) यादीतील उमेदवारांनी त्यांच्या संपुर्ण कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर ते उमेदवार पात्र (Eligible) होणार असल्याने सध्याच्या हंगामी पात्र (Eligible) यादीमध्ये अनुक्रमांकासह निवडीमध्ये बदल होऊ शकतो याची सर्व हंगामी पात्र (Eligible) व तात्पुरत्या पात्र (Conditional Eligible) उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**वरील प्रक्रियेमध्ये प्राप्त होणाऱ्या उमेदवारांच्या कागदपत्रानुसार उमेदवारांची पात्रता / अपात्रता ठरविण्यात येईल व पात्र उमेदवारांची गुणांकन पद्धतीने अंतीम गुणवत्ता यादी https://www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल, तसेच उमेदवारांची अंतिम निवड यादी पनवेल महानगरपालिकेच्या सुचना फलकावर लावण्यात येईल. व फक्त निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या नियुक्ती बाबत त्यांच्या ई-मेल द्वारे / टपालाद्वारे कळविण्यात येईल.**

(सचिन पवार)
**उपायुक्त (आरोग्य)**
**पनवेल महानगरपालिका**

सोबत :- १) अधिपरिचारिका (स्त्री) - **अ** - पात्र (Eligible), **प्रपत्र ब** - तात्पुरते पात्र (Conditional Eligible)
**प्रपत्र क** - अपात्र (Not Eligible)

२) अधिपरिचारिका (पुरूष) - **अ** - पात्र (Eligible), **प्रपत्र ब** - तात्पुरते पात्र (Conditional Eligible)

३) आरोग्यसेविका - **अ** - पात्र (Eligible), **प्रपत्र ब** - तात्पुरते पात्र (Conditional Eligible)
**प्रपत्र क** - अपात्र (Not Eligible)

४) LHV - **प्रपत्र ब** - तात्पुरते पात्र (Conditional Eligible), **प्रपत्र क** - अपात्र (Not Eligible)

५) प्रयोगशाळा तंत्रज्ञ - **प्रपत्र ब** - तात्पुरते पात्र (Conditional Eligible), **प्रपत्र क** — अपात्र (Not Eligible)

Scanned with CamScanner